# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
## पुणे विभागीय मंडळ शिवाजीनगर पुणे ४११००५
## परिपत्रक

संदर्भ . १.राज्य मंडळ परीक्षा.३ /३२०२ /दिनांक १२.०८.२०२४ चे प्रकटन

२.या विभागाचे क्रमांक खाजगी ओ.१ /ओ.२२०२५ /४४२७ दिनांक १६.०८.२०२४ चे प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी विदयार्थ्यांना फॉर्म नंबर १७ ची ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी परीक्षेसाठी खाजगी विदयार्थ्यांकरीता सर्व शाळा व कनिष्ठ महाविदयालयांना मंडळाच्या अटी व शर्तीनुसार, नावनोंदणी केलेल्या विदयार्थ्यांची हार्डकॉपी व आवश्यक सर्व कागदपत्रे घेवून, ऑनलाईन पध्दतीने त्याची तपासणी करून पात्र असलेलेच अर्ज मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत संदर्भिय प्रकटनाव्दारे कळविण्यात आलेले होते.

आता मंडळाच्या असे निदर्शनास येत आहे की, मंडळाच्या स्तरावर तपासणी करत असतांना अनेक त्रुटी असलेले अर्ज शाळास्तर लॉगिन मधून विदयार्थ्यांने शाळेकडे जमा केलेले कागदपत्र व ऑनलाईन प्रक्रियेमध्ये स्कॅन केलेले कागदपत्र यांची पडताळणी कनिष्ठ महाविदयालया स्तरावर खात्री न करता तसेच अपात्र होणारे अर्जही कनिष्ठ महाविदयालयाच्या प्राचार्यांच्या लॉगिन मधून विभागीय मंडळाकडे फॉरवर्ड केलेले आहेत. सदरचे अर्ज आपल्या स्तरावर त्रुटी मध्ये काढून अपूर्ण अर्ज **incomplete** करून विदयार्थ्याच्या लॉगिंनला पाठवायला पाहीजे होते, असे न केल्याने मंडळामार्फत आता कार्यवाही करण्यास विलंब होत आहे व याचा परिणाम विदयार्थ्याला परीक्षा आवेदनपत्र भरण्यावर होत आहे तरी याबाबत पुनःश्च तपासणी करून कार्यवाही करावी.

संदयस्थितीत पुणे,अहिल्यानगर,सोलापूर जिल्हयातील काही कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांचे अर्ज खालील प्रमाणे प्रलंबित आहेत

१.विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरून कॉलेजकडे पाठविलेले आहेत परंतु कॉलेजनी त्यावर कार्यवाही केलेली नाही यामूळे कॉलेजस्तरावर एकूण ६३६ अर्ज प्रलंबित आहेत.

२.कॉलेजनी तपासलेले आहेत परंतू मंडळाकडें पाठविलेले नाहीत एकूण अर्ज ०४६

३.मंडळानी तपासून त्रुटी काढून विदयार्थी व कनिष्ठ महाविदयालयाकडे पाठविलेले अर्ज एकूण १८८२

उपरोक्त १ ते ३ बाबत प्रत्येक कनिष्ठ महाविदयालयांनी आपल्या लॉगिंग वर जावून कार्यवाही करावी,तसेच त्रुटीबाबत विदयार्थ्यांना समक्ष बोलवावे जेणे करून विदयार्थ्यांना त्रुटी बाबत पुर्तता करणे वेळेत सोईचे होईल व त्रुटींची पुर्तता करून घेवून अर्ज मंडळाकडे विनाविलंब पाठवावेत.याबाबत विदयार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र भरण्यास विलंब झाल्यास सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(औदुबंर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ ४११००५

क्रमांक पुविमं/ओ२/6114
दिनांक २१.११.२०२४